Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

नशिराबादच्या सहा सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार

(पान २ वर)




। मंगळवार, दि. 8 सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १५० ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

## Selected

### 3 ऑक्टोबरचा दिवस भारतीय संघासाठी ऐतिहासिक ठरणार

मुंबई :भारतीय क्रिकेट संघाच्या बाबतीत महत्वाची बातमी समोर आली आहे. 3.ऑक्टोबर हा भारतीय क्रिकेटसाठी एक ऐतिहासिक दिवस ठरणार आहे. या दिवशी भारतीय संघाला दोन देशांचा सामना करावा लागणार आहे. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात दुसऱ्यांदा भारतीय संघ एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या देशांमध्ये सामने खेळणार आहे. दरम्यान, 3 ऑक्टोबर रोजी भारतीय संघ वेस्ट इंडिजविरुद्ध तिसरा एकदिवसीय सामना खेळणार आहे.आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकासाठीचा एक सामना जपानमध्ये, तर दुसरा सामना वेस्ट इंडिजविरुद्ध मुल्लानपूर, न्यू चंदीगड येथे खेळला जाईल. पुरुष क्रिकेट स्पर्धेतील कांस्य आणि सुवर्णपदकाचे सामने 3 ऑक्टोबर रोजी जपानमधील निशिन येथील कोरोगी स्पोर्ट्स पार्कमध्ये खेळले जातील.

### आदिवासी आरक्षणातील प्रतिनिधित्वाचा प्रश्न ऐरणीवर; मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय उच्चस्तरीय समिती

# छोट्या संवर्गातील आरक्षणाच्या बिंदुनामावलीचा फेरआढावा!

## अनुसूचित जमातीसह सर्व राखीव प्रवर्गांना योग्य प्रतिनिधित्व देण्यासाठी पुनर्विलोकन

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी : राज्यातील सरळसेवा भरतीमध्ये छोट्या संवर्गातील पदे भरण्यासाठी लागू असलेल्या आरक्षणाच्या बिंदुनामावलीवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. छोट्या संवर्गातील पदांच्या बिंदुनामावलीचे पुनर्विलोकन करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.**

अनुसूचित जमातीसह सर्व राखीव प्रवर्गांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे आणि बिंदुनामावलीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात, या उद्देशाने समिती काम करणार आहे. सरळसेवा पदभरतीमध्ये छोट्या संवर्गातील पदे भरण्यासाठी शासनाने ६ मार्च २०२४ रोजी बिंदुनामावली निश्चित केली होती. मात्र, या पद्धतीमुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना अपेक्षित आणि योग्य प्रतिनिधित्व मिळत नसल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे आल्या होत्या. त्यामुळे बिंदुनामावलीचा फेरआढावा घेण्याची मागणी आदिवासी समाज आणि लोकप्रतिनिधींकडून केली जात होती.



### जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीनंतर निर्णय

या प्रश्नावर २ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची ५२ वी बैठक झाली होती.

या बैठकीत छोट्या संवर्गातील बिंदुनामावलीच्या अनुषंगाने सर्व राखीव प्रवर्गांना योग्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच अनुसूचित जमातीच्या लोकप्रतिनिधींची मते विचारात घेऊन विद्यमान बिंदुनामावलीचे पुनर्विलोकन करण्याची भूमिका मांडण्यात आली होती.

याच पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारने समिती गठीत केली आहे. त्यामुळे छोट्या संवर्गातील पदभरतीमध्ये आरक्षणाचे प्रतिनिधित्व, पदांची संख्या आणि विविध राखीव प्रवर्गांना मिळणाऱ्या संधी यांचा नव्याने अभ्यास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### समितीत लोकप्रतिनिधींसह वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश

मुख्य सचिव हे समितीचे अध्यक्ष असतील. समितीत लोकसभा व विधानसभा सदस्यांसह सामान्य

### आरक्षणातील प्रतिनिधित्वाचा प्रश्न सुटणार?

छोट्या संवर्गातील पदांची संख्या मर्यादित असल्याने आरक्षणाची अंमलबजावणी करताना विविध प्रवर्गांना प्रतिनिधित्व मिळण्यासंदर्भात अनेकदा प्रश्न निर्माण होतात. विद्यमान बिंदुनामावलीमुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय होत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर समितीचा अहवाल महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रशासन, विधि व न्याय, सामाजिक न्याय, इतर मागास बहुजन कल्याण आणि आदिवासी विकास विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

समितीमध्ये डॉ. हेमंत सावरा, राजेंद्र गावित आणि राजू तोडसाम या लोकप्रतिनिधींचा समावेश आहे. त्याचबरोबर अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग; प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग; प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग; सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग; सचिव, आदिवासी विकास विभाग आणि सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग यांचा समावेश आहे. सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग हे समितीचे सदस्य-सचिव असतील.

# उपमुख्यमंत्री शिंदेंची कारवाई; डॉक्टरांना मारहाण प्रकरणात पालघरच्या शहरप्रमुखाची पक्षातून हकालपट्टी

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** पालघर येथील 'रिलीफ' या खासगी रुग्णालयात दहीहंडीतील जखमी गोविंदाला डिस्चार्ज देण्याच्या वादावरून शिवसेना आणि भाजप पदाधिकाऱ्यांनी डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याची अत्यंत गंभीर घटना घडली आहे. या घटनेची अत्यंत गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांनी तात्काळ कडक पावले उचलत आरोपी शिवसेना शहरप्रमुखाची पक्षातून हकालपट्टी केली आहे. डोंबिवलीतील नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच पालघर रुग्णालयातील या धुडगुसाचा उल्लेख न्यायालयाने केला. देशात कायद्याचे राज्य आहे की नाही? डॉक्टरांवर हल्ले करणाऱ्या लोकांना रस्त्यावर मोकाट फिरायला नको, अशा कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारची कानउघाडणी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या या टिप्पणीनंतर गोव्यात आयोजित पश्चिम विभागीय परिषदेच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त केला. "पालघरमधील रुग्णालयात घडलेली घटना अत्यंत चुकीची आणि निंदनीय आहे. डॉक्टरांवर आणि कर्मचाऱ्यांवर हात उचलणे कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरू शकत नाही. काहीही अडचण असली तरी कायदा हातात घेणे चुकीचे आहे," असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांचे कान उपटले. तसेच या प्रकरणात थेट कारवाई करत शिवसेनेचे पालघर शहरप्रमुख राहुल घरत (Rahul Gharat) याचे पक्षातून तात्काळ निलंबन



करून त्याची हकालपट्टी केली. या प्रकरणात राहुल घरतला पोलिसांनी अटक केली असून त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.पालघरच्या रिलीफ रुग्णालयात रिसेप्शनिस्टला मारहाण आणि डॉक्टरांसोबत गैरवर्तन केल्याप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात शिवसेना जिल्हाप्रमुख कुंदन संख्ये, भाजप आमदार राजेंद्र गावित यांचे चिरंजीव रोहित गावित आणि राहुल घरत यांच्यासह तब्बल 17 जणांवर पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाला आता एक नवी कलाटणी मिळाली आहे. ज्या जखमी गोविंदांना डिस्चार्ज देण्यावरून हा सर्व वाद पेटला होता, त्याच गोविंदांनी आता रिलीफ रुग्णालयाच्या डॉक्टरांविरोधात पालघर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. "आम्हाला केवळ किरकोळ दुखापत झाली होती. तरीही डॉक्टर जाणीवपूर्वक डिस्चार्ज न देता गरज नसताना आम्हाला आयसीयूमध्ये (ICU) ठेवून मोफत उपचारांऐवजी आर्थिक फायद्यासाठी अडकवून ठेवण्याचा प्रयत्न करत होते. वारंवार विनंती करूनही डॉक्टरांनी दुर्लक्ष केल्यामुळेच आम्ही शिवसेना जिल्हाप्रमुख कुंदन संख्ये यांची मदत मागितली होती," असा दावा जखमी गोविंदांनी केला आहे. गुन्हा दाखल करावा, अशी मागणी गोविंदांनी केली आहे. पालघर येथील 'रिलीफ' या खासगी रुग्णालयात दहीहंडीतील जखमीदेण्याच्या वादावरून शिवसेना आणि भाजप पदाधिकाऱ्यांनी डॉक्टरांना व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याची अत्यंत गंभीर घटना घडली आहे.शिंदे यांनी तात्काळ कडक पावले उचलत आरोपी शिवसेना शहरप्रमुखाची पक्षातून हकालपट्टी केली आहे. डोंबिवलीतील नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच पालघर रुग्णालयातील या धुडगुसाचा उल्लेख न्यायालयाने केला.

# आमच्या लोकांनी काय खायचं हे बाहेरुन आलेल्या धर्मगुरूने शिकवू नये

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** र्गापुजेदरम्यान मांसाहार करणाऱ्यांवरून बागेश्वर बाबा ऊर्फ धीरेंद्र शास्त्री यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. धीरेंद्र शास्त्री यांनी सणांच्या काळात मांसाहार करणाऱ्यांना थेट 'पाखंडी' असे संबोधत ही सवय सोडण्याचे आवाहन केले होते. मात्र, तमिळनाडू किंवा इतर राज्यांप्रमाणे बंगालच्या परंपरेवर बोट ठेवणाऱ्या बागेश्वर बाबांचा हा दावा खुद्द पश्चिम बंगाल भाजपचे प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनीच अत्यंत कडक शब्दांत फेटाळून लावला आहे. बागेश्वर बाबांच्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया देताना भाजप प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य म्हणाले, "बाहेरून आलेला कोणताही धर्मगुरू पश्चिम बंगालमधील लोकांनी काय खावे किंवा काय परिधान करावे हे ठरवू शकत नाही. बंगाली लोक जे खात आले आहेत तेच खाणार.

बंगाली लोकांनी मासे आणि मटण खायचे नाही का? स्वामी विवेकानंदांनी (Swami Vivekananda) स्वतः याबाबत सांगितले आहे आणि त्यांच्यापेक्षा मोठा धर्मगुरू कोण असू शकतो?"बंगालमधील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचे दाखले देत भट्टाचार्य म्हणाले की, दुर्गापुजेच्या काळात अष्टमीला 'लुची' (पुरी) आणि नवमीला मटण खाणे ही बंगालची शतकानुशतके चालत आलेली सांस्कृतिक परंपरा आहे. इतकेच नव्हे तर बंगालमध्ये मां कालीला (Maa Kali) बोकडाचा बळी देण्याची प्रथा आहे. त्यामुळे लोक काय खातील यावर कोणीही बंधने आणू शकत नाही. आम्ही आमची परंपरा अशीच पुढे चालू ठेवणार आहोत, असे भाजप प्रदेशाध्यक्षांनी स्पष्ट केले.धीरेंद्र शास्त्री यांनी अलिकडेच पश्चिम बंगालचा दौरा केला होता.

# राज्यात मुसळधार पाऊस पडणार: पंजाबराव डख

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** पावासाळा सुरु होऊन ती महिन्यांचा कालावधी लोटला आहे. अद्यापही अनेक भागात चांगला पाऊस झाला नाही. परिणामी शेतकऱ्यांची खरीपाची पिकं वाया चालली आहेत. पिण्याच्या पाण्याचा जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशातच हवामानाचे अभ्यासक पंजाबराव डख यांनी पावसाबाबत महत्वाचा अंदाज वर्तवला आहे. 13 सप्टेंबरपर्यंत राज्यात मोठ्या पावसाची शक्यता कमी असल्याचं डखांनी सांगितलं आहे. मात्र, 14 सप्टेंबर ते 22 सप्टेंबर राज्यातील अनेक भागात मुसळधार पावसाची शक्यता पंजाबराव डखांनी वर्तवली आहे. पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, 13 सप्टेंबरपासून पावसाला सुरुवात होणार आहे. 14 ते 22 सप्टेंबरदरम्यान राज्यातील अनेक भागांत जोरदार पावसाचा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे.

पंजाबराव डख यांनी 6 सप्टेंबर रोजी दिलेल्या अंदाजानुसार, 13 सप्टेंबरपर्यंत राज्यात मोठ्या पावसाची शक्यता कमी असून त्यानंतर पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. विशेषतः




16 ते 22 सप्टेंबरदरम्यान दक्षिण महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि कोकणातील अनेक भागांत चांगला ते जोरदार पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.13 सप्टेंबरला काही भागात सुरुवात झाल्यानंतर 14 सप्टेंबरपासून राज्यातील पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यानंतर 16 ते 22 सप्टेंबरदरम्यान राज्यातील अनेक भागांत चांगला पाऊस होण्याची शक्यता सांगण्यात आली आहे.पंजाब डख यांच्या अंदाजानुसार 16 ते 22 सप्टेंबरदरम्यान दक्षिण महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात चांगला पाऊस होऊ शकतो. त्यामुळे सध्या कोरडे असलेले छोटे तलाव, बंधारे आणि जलसाठ्यांमध्ये पाण्याची आवक वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही पाऊस झाल्यास पाण्याची आवक वाढू शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# ज्यांनी देवाला सोडलं नाही, दानपेटीवर डाका टाकला

## ते आमदार खासदारांना काय सोडणार, नाना पटोलेंचा भाजपवर घणाघात

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यात पुन्हा ऑपरेशन टायगर 4 होणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. शिवसेना शिंदे गटाचे आमदार मुरजी पटेल यांनी नुकचं ठाकरेंचे 14 आमदार फुटण्याचं वक्तव्य केलं होत. त्यांच्या या वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. यावर काँग्रेस आमदार नाना पटोले (NANA PATOLE) प्रतिक्रिया दिली आहे. ज्यांनी राम मंदिराच्या दानावर डाका टाकला, ते आमदार खासदारांना काय सोडणार, ज्या लोकांनी देवाला सोडलं नाही, रामाच्या मंदिराला सोडलं नाही त्यांच्याविषयी काय बोलायचं? असा टोला पटोलेंनी लगावला. भाजपा आणि शिवसेनेचे मानसिकताच तिच असल्याचा घणाघात नाना पटोलेंनी केला आहे. मराठ्यांच्या आणि धनगरांचे आंदोलनाबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले की हे आंदोलन सरकार निर्मित आहे. ज्या ज्या वेळेस ही अशी आंदोलने होतात त्या त्या वेळेस सरकार मोठमोठ्या उद्योजकांना महाराष्ट्र विकायचं पाप करते. भाजपाने निवडणुकीपूर्वी आम्ही सत्तेत आल्यास सगळ्यांना आरक्षण देऊ ही भूमिका घेतली होती.

राज्यात आणि केंद्रात तुमची सरकार आहे त्यामुळे तुम्ही आरक्षण का देऊ शकत नाही असा सवाल त्यांनी केला. आरक्षणाबाबत महाराष्ट्र सरकार संभ्रम निर्माण करून ठेवला आहे असा आरोप नाना पटोले यांनी केला.प्रफुल्ल पटेल म्हणतात की धानाला बोनस देऊ,



.मात्र परिणय फुके म्हणतात की आम्ही आता कर्जमाफी दिली आहे बोनस देणार नाही, अशी महायुतीची नेत्यांच्या भूमिकामध्ये तफावत दिसून येत आहे. यावर बोलताना काँग्रेस नेते आमदार नाना पटोले म्हणाले की महायुतीचे नेते ही स्वार्थासाठी एकत्रित आले आहेत. यांना महाराष्ट्रातील शेतकरी कसा घोरपडून जाईल. महाराष्ट्र कसं विकता येईल. सामाजिक व्यवस्था कशी संपुष्टातील याविषयी महायुती सरकार काम करत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी लगावला.कोरोना प्रतिबंधक लस घेतल्यानंतर लोकांमध्ये कर्करोग (कॅन्सर) आणि हृदयविकाराच्या झटक्याचे (हार्ट अटॅक) प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे, असा खळबळजनक आणि गंभीर आरोप काँग्रेसचे नेते तथा आमदार नाना पटोले यांनी केला आहे. गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथे आयोजित एका जाहीर कार्यक्रमात कार्यकर्त्यांना आणि नागरिकांना संबोधित करताना त्यांनी हे वक्तव्य केले. आपल्या भाषणात नाना पटोले म्हणाले की, देशात कोरोना महामारीच्या काळात मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम राबवण्यात आली, मात्र या लशीचे अत्यंत घातक परिणाम आता समोर येऊ लागले आहेत. कोरोना लस घेतलेल्या नागरिकांमध्ये अचानक हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू होण्याचे तसेच कर्करोगासारखे गंभीर आजार जडण्याचे प्रमाण वेगाने वाढले असल्याचा दावा त्यांनी केला. केंद्र सरकारच्या तत्कालीन धोरणांवर आणि आरोग्य व्यवस्थेवर निशाणा साधत त्यांनी या गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधले.राज्यात पुन्हा ऑपरेशन टायगर 4 होणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. शिवसेना शिंदे गटाचे आमदार मुरजी पटेल यांनी नुकचं ठाकरेंचे 14 आमदार फुटण्याचं वक्तव्य केलं होत. त्यांच्या या वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. यावर काँग्रेस आमदार नाना पटोले (NANA PATOLE) प्रतिक्रिया दिली आहे. ज्यांनी राम मंदिराच्या दानावर डाका टाकला, ते आमदार खासदारांना काय सोडणार, ज्या लोकांनी देवाला सोडलं नाही, रामाच्या मंदिराला सोडलं नाही त्यांच्याविषयी काय बोलायचं? असा टोला पटोलेंनी लगावला. भाजपा आणि शिवसेनेचे मानसिकताच तिच असल्याचा घणाघात नाना पटोलेंनी केला आहे. मराठ्यांच्या आणि धनगरांचे आंदोलनाबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले की हे आंदोलन सरकार निर्मित आहे.

# 20 रुपयांच्या वडापावसाठी खर्चीले तब्बल 15 हजार रुपये

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** अनेक लोकांना वेगवेगळ्या ठिकणच्या विशिष्ट पदार्थांची मोठी आवड असते. ते लोक कुठंही गेले तरी आवडणारे पदार्थ नेहमी मिस करतात. उदाहरणच द्याचं झालं तर मुंबईचा वडापाव. अनेक लोकांना मुंबईचा वडापाव प्रचंड आवडतो. पण मुंबईचा वडापाव खाण्यासाठी कोणी दिल्लीहून मुंबईला येईल का? तर याचं उत्तर हो आहे. एका तरुणीने मुंबईचा 20 रुपयांचा वडापाव खाण्यासाठी तब्बल 15 हजार रुपये खर्च केले आहेत. वडापा खाण्यासाठी ही तरुणी थेट दिल्लाहून मुंबईत दाखल झाली आहे. पाहुयात सविस्तर माहिती. एका मुलीने 20 रुपयांच्या वडापावसाठी 15000 रुपये खर्च केले. ती दिल्लीहून वडापाव खाण्यासाठी विमानाने मुंबईत आली होती. दिल्लीत राहणाऱ्या एका कंटेंट क्रिएटरला दिल्लीचा वडापाव आवडला नाही, म्हणून आवडता वडापा खाण्यासाठी ही तरुणी मुंबईला आली. विमानप्रवास, हॉटेल आणि इतर खर्चांसहित, तिने 20 रुपयांच्या वडापावसाठी अंदाजे 15000 रुपये खर्च केले. एखाद्या विशिष्ट खाद्यपदार्थाबद्दलची तुमची आवड किती तीव्र असू शकते? कदाचित काही किलोमीटरचा प्रवास, पण दिल्लीतील एका कंटेंट क्रिएटरने त्यासाठी संपूर्ण शहरच बदलून टाकले. तिला दिल्लीतला वडापाव आवडला नाही, म्हणून तिने मुंबईला विमानप्रवास केला.ज्या वडापावसाठी तिने इतका लांबचा प्रवास केला, त्याची किंमत फक्त 20 रुपये होती. संपूर्ण प्रवासावर जवळपास 15000 रुपये खर्च केल्यानंतर, तिचा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आल्यावर तो चर्चेचा विषय बनला. दरम्यान, तिला दिल्लीतल्या वडापावची चव आवडली नाही. तिला वाटले की अस्सल वडापावचा खरा आनंद घेण्यासाठी मुंबई हे एकमेव ठिकाण आहे. वेळ न घालवता तिने मुंबईला जायचे ठरवले.

# त्र्यंबकेश्वर दर्शनाला निघालेल्या 17 वर्षीय तरुणीचा एसटीखाली चिरडून मृत्यू

## ठक्कर बाजार बसस्थानकातील धक्कादायक घटना; गर्दीत धक्का लागून खाली पडली

जन सम्राट टाईम्स

**नाशिक| प्रतिनिधी :** त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी कुटुंबासह निघालेल्या १७ वर्षीय तरुणीचा एसटी बसखाली येऊन दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना नाशिकच्या गजबजलेल्या ठक्कर बाजार बसस्थानकात घडली. रविवारी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या दुर्घटनेमुळे बसस्थानक परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेने तरुणीच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत तरुणीचे नाव आकांक्षा रामभाऊ शेलार (वय १७) असल्याची माहिती मिळाली आहे. आकांक्षा आपल्या कुटुंबीयांसह त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी जाण्यासाठी ठक्कर बाजार बसस्थानकात आली होती. रविवारी रात्री बसस्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी होती. बस पकडण्यासाठी प्रवाशांची धावपळ सुरू असतानाच गर्दीत आकांक्षाला कोणाचा तरी जोरदार धक्का लागला. त्यामुळे ती अचानक खाली पडली. याचवेळी स्थानकातून पुढे जाणाऱ्या एसटी बसच्या मागील चाकाखाली आकांक्षा आल्याने गंभीर अपघात झाला. या दुर्घटनेत तिचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. अचानक घडलेल्या या घटनेने बसस्थानकातील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अपघातानंतर आकांक्षाच्या चुलत भावाने तत्परता दाखवत तिला रिक्षातून तातडीने नाशिक जिल्हा रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिचा



मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर तिला मृत घोषित केले. दरम्यान, आपल्या डोळ्यांसमोर मुलीचा भीषण अपघात झाल्याने आकांक्षाच्या आईला मोठा मानसिक धक्का बसला. या घटनेनंतर त्यांना बसस्थानकातच भोवळ आल्याची माहिती आहे. कुटुंबीयांवर ओढवलेल्या या दुर्दैवी प्रसंगामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, एसटी बसचालकाच्या भूमिकेबाबतही चौकशी केली जात आहे. घटनेमागील नेमकी परिस्थिती, गर्दीतील धक्का आणि बसच्या हालचाली याबाबत तपासानंतर अधिक स्पष्टता येणार आहे. दरम्यान, एसटी महामंडळाच्या म्हणण्यानुसार, प्रवाशांची मोठी गर्दी आणि लोटालोट यामुळे ही दुर्घटना घडली. मात्र, बसस्थानकांवरील वाढती गर्दी, प्रवाशांच्या सुरक्षिततेची व्यवस्था आणि बसच्या हालचालीदरम्यान आवश्यक खबरदारी याबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. एसटीच्या उत्पन्नात ऑगस्टमध्ये मोठी वाढ प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन बसफेऱ्यांचे नियोजन केल्याचा सकारात्मक परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर झाल्याचे महामंडळाने म्हटले आहे. जुलैच्या तुलनेत ऑगस्टमध्ये एसटीच्या उत्पन्नात ६६ कोटी रुपयांची वाढ झाली. ऑगस्टमध्ये महामंडळाने प्रथमच एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मासिक उत्पन्न नोंदविले. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट रोजी एसटीने एका दिवसात सुमारे ४५ कोटी रुपयांची तिकीटविक्री केली. महामंडळाच्या म्हणण्यानुसार, हे एका दिवसातील विक्रमी उत्पन्न आहे. सध्या एसटीला दररोज सरासरी ३४ ते ३५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. स्थानिक मागणीनुसार फेऱ्यांवर भर परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या आढावा बैठकीनंतर वाहतूक नियोजनात बदल करण्यात आल्याचे महामंडळाने सांगितले. लांब पल्ल्याच्या तुलनेने कमी प्रवासी असलेल्या फेऱ्यांऐवजी प्रत्यक्ष मागणी असलेल्या मार्गांवर अधिक बसफेऱ्या चालविण्यावर भर देण्यात आला.

## ‘साकेत अयोध्या नगरीचा खरा इतिहास’ विषयावर प्रवचन



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** वर्षावास प्रवचन मालिकेअंतर्गत ६ सप्टेंबर २०२६ रोजी ‘साकेत अयोध्या नगरीचा खरा इतिहास’ या विषयावर विशेष प्रवचनाचे आयोजन करण्यात आले. जळगाव जिल्हा अध्यक्ष आयु. नी. प्रियंका ताई अहिरे यांनी उपस्थितांना या विषयाची माहिती साध्या, सोप्या आणि सरळ भाषेत समजावून सांगितली. प्रियंका ताई अहिरे यांनी साकेत नगरी व अयोध्येच्या इतिहासाशी संबंधित विविध पैलूंवर प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या शैलीतील प्रवचनाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रवचनाने वर्षावास प्रवचन मालिकेतील नवव्या पुष्पाची सुरेल गुंफण झाली. पुण्यानुमोदनानिमित्त खीरदान व बाबासाहेबांचा फोटो विहाराला भेट यानंतर दिवंगत राजू लक्ष्मण गायकवाड यांच्या पुण्यानुमोदनानिमित्त त्यांच्या कन्या सोनाली गायकवाड यांनी खीरदान केले. तसेच परमपूज्य बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो विहाराला दान करून वडिलांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली. यावेळी आयु. नी. प्रतिभाताई शिरसाठे (शहर संघटक), आयु. नी. शोभाताई घायतडक (शहर संघटक), आयु. नी. सुजाताताई जंजाळे (शहर संघटक), आयु. नी. मायाताई निकम, आयु. नी. सीमा ताई बावस्कर, आयुष्यमानी शिल्पाताई गायकवाड, आयु. नी. वैशालीताई जंजाळे, आयु. नी. वंदनाताई शेजवळ, आयु. मा. कल्पनाताई मोटे, आयु. मा. लोखंडे ताई, आयु. मा. भालेराव ताई यांच्यासह असंख्य उपासिका व लहान बालक-बालिका उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## नशिराबादच्या सहा सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार

### जळगाव जिल्ह्याच्या महसुली हद्दीत प्रवेशबंदी




जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** नशिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या सहा सराईत गुन्हेगारांवर पोलिसांनी मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागीय दंडाधिकारी, जळगाव विभाग यांनी दिलेल्या आदेशानुसार संबंधित सहा जणांना एक वर्षासाठी संपूर्ण जळगाव जिल्ह्याच्या महसुली हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे.

सहा जणांवर कारवाई हद्दपार करण्यात आलेले सर्व इसम नशिराबाद, ता. जि. जळगाव येथील रहिवासी असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत— अताउल्ला उर्फ मायाबाई अमानुल्ला शहा मुकतार शहा खलील शहा अक्रम शहा सादिक शहा रोहित दिलीप नाथ विपुल गोविंदा नाथ आवेश उर्फ काल्या शेख जहांगीर या इसमांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याने त्यांच्या गुन्हेगारी कारवायांमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते. परिसरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नशिराबाद पोलिसांकडून हद्दपारीचा प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावावर सुनावणी झाल्यानंतर उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी संबंधित सहा जणांना एक वर्षासाठी जळगाव जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले. आदेश मोडल्यास अटकेचा इशारा हद्दपारीच्या कालावधीत संबंधितांनी सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी न घेता जळगाव जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश केल्यास त्यांच्या विरोधात महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच त्यांना अटक करण्यात येईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. API योगिता नारखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गुणवंत देशमुख, चंद्रकांत पाटील, तसेच पोलीस कॉन्स्टेबल भरत बाविस्कर आणि पंकज सोनवणे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. नशिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या सहा सराईत गुन्हेगारांवर पोलिसांनी मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

## लोकसहभागातून स्मशानभूमी परिसराची स्वच्छता कोल्हाडीतील युवकांचा पुढाकार

जन सम्राट टाईम्स

**बोदवड । प्रतिनिधी:** कोल्हाडी गावातील सुमारे दोन एकर परिसरात असलेल्या स्मशानभूमीची नागरिक व युवा वर्गाच्या पुढाकारातून स्वच्छता करण्यात आली. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वाढलेले गवत आणि झाडाझुडपांमुळे स्मशानभूमीचा परिसर जंगलमय झाला होता. त्यामुळे नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने परिसराची साफसफाई करून वाढलेल्या गवतावर फवारणी केली. स्मशानभूमी परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष असल्याने येथे नेहमीच गारवा आणि निसर्गरम्य वातावरण असते. मात्र, दिवाबत्ती, पाणी आणि नियमित स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांकडे पुरेसे लक्ष नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. गावातील एखाद्या व्यक्तीचा नैसर्गिक मृत्यू झाल्यानंतर नातेवाईकांना पोहोचण्यास विलंब झाल्यास अंत्यसंस्कार रात्री उशिरापर्यंत करण्याची वेळ येते.



अशावेळी स्मशानभूमीत पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने अंत्यविधीसाठी उपस्थित नागरिकांची मोठी गैरसोय होते. त्यामुळे या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. ग्रामपंचायतीने नियमित देखभाल करावी स्मशानभूमी ही गावातील प्रत्येक नागरिकाच्या भावना आणि संस्कारांशी जोडलेली महत्त्वाची जागा आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने येथे नियमित स्वच्छता, पुरेशी दिवाबत्ती, पाण्याची व्यवस्था आणि पावसाळ्यात वाढणाऱ्या गवताची वेळोवेळी फवारणी करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, गावातील नागरिक व युवा वर्गाने सामाजिक उपक्रम राबविण्याबाबत चर्चा केली. कोणताही पूर्वनियोजित कार्यक्रम किंवा प्रसिद्धीचा हेतू न ठेवता, गरजेच्या वेळी समाजोपयोगी काम करून माणुसकीचे दर्शन घडवावे, या भावनेतून स्मशानभूमी परिसराची स्वच्छता करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार युवकांनी स्वखर्चाने फवारणी करून परिसर स्वच्छ केला. या सामाजिक उपक्रमात श्रीकृष्ण राणे, योगेश झांबरे, भगवत चोपडे, वैभव राणे, कार्तिक निकम, भगवान भिल, सुरज राणे, गणेश खडसे, नयण राणे आणि नामदेव लढे यांनी परिश्रम घेतले. नागरिकांच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे. कोल्हाडी गावातील सुमारे दोन एकर परिसरात असलेल्या स्मशानभूमीची नागरिक व युवा वर्गाच्या पुढाकारातून स्वच्छता करण्यात आली. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वाढलेले गवत आणि झाडाझुडपांमुळे स्मशानभूमीचा परिसर जंगलमय झाला होता. त्यामुळे नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने परिसराची साफसफाई करून वाढलेल्या गवतावर फवारणी केली.

## तुटलेले ढापे ठरताहेत अपघाती सापळे बुद्ध विहार परिसरासह गावातील रस्त्यांची दुरवस्था

### रात्रीच्या वेळी दुचाकीस्वार व पादचाऱ्यांना जीवघेणा धोका

जन सम्राट टाईम्स

**लोणवाडी । प्रतिनिधी:** बोदवड तालुक्यातील लोणवाडी येथे बुद्ध विहाराजवळील परिसरासह गावातील अंतर्गत रस्त्यांवर उघड्या गटारी, तुटलेले ढापे आणि रस्त्यांची दुरवस्था यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गावालगतच्या महामार्ग परिसरातही गटारी उघड्या असल्याने आणि अनेक ठिकाणी ढापे तुटलेल्या अवस्थेत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. तुटलेले ढापे महिनोन्महिने जैसे थे गटारीवरील ढापे तुटल्यानंतर त्यांची वेळेत दुरुस्ती होत नसल्याने अनेक ठिकाणी गटारी उघड्या पडल्या आहेत.

काही ठिकाणी केवळ कमकुवत लोखंडी ब्रॅकेट्सच्या आधारे व्यवस्था करण्यात आली असून, तीदेखील धोकादायक स्थितीत आहेत. अवजड वाहनांची सततची ये-जा, रस्त्यांची कामे तसेच बांधकामादरम्यान गटारींचे नुकसान होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गटारींचे ढापे तुटल्यानंतर संबंधित प्रशासनाने त्यांची तातडीने दुरुस्ती



करणे अपेक्षित असतानाही अनेक ठिकाणी परिस्थिती महिनोन्महिने जैसे थे असल्याचे चित्र आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेला वाहन चालविताना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी धोका अधिक दिवसा उघड्या गटारी आणि तुटलेले ढापे सहज दिसून येतात. मात्र, रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाअभावी ही धोकादायक ठिकाणे वाहनधारकांच्या लक्षात येत नाहीत. विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना याचा मोठा धोका असून, एखादा वाहनचालक थेट गटारीत कोसळून गंभीर जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त गावातील रस्ते, गटारी आणि सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित मूलभूत सुविधांची नियमित देखभाल होणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. संभाव्य अपघात घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा अपघात होण्यापूर्वीच धोकादायक ठिकाणांची दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. तातडीने ढापे बसविण्याची मागणी लोणवाडीतील धोकादायक ठिकाणांची प्रशासनाने तातडीने पाहणी करून तुटलेले ढापे बसवावेत, उघड्या गटारींवर मजबूत व सुरक्षित झाकणे बसवावीत. तसेच आवश्यक ठिकाणी प्रकाशव्यवस्था, सुरक्षा उपाययोजना आणि सूचना फलक लावावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

## श्रीनाथकंटेनर्समध्येएचआयव्ही/एड्सजनजागृतीकार्यक्रम

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव। प्रतिनिधी:** राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ‘इंटेंसिफाइड कॅम्पेन 3.0’ अंतर्गत श्रीनाथ कंटेनर्स, जळगाव रोड, धरणगाव येथे एचआयव्ही/एड्स व लैंगिक आजारांबाबत जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. ग्रामीण रुग्णालय धरणगाव येथील आयसीटीसी (ICTC) आणि राष्ट्र विकास मायग्रंट टी.आय. प्रोजेक्ट, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ५ सप्टेंबर २०२६



रोजी हा उपक्रम राबविण्यात आला. श्रीनाथ कंटेनर्समधील पत्री डबी बनविणाऱ्या कारखान्यात काम करणाऱ्या स्थलांतरित कामगारांना एचआयव्ही/एड्सबाबत शास्त्रीय माहिती देण्यात आली. एचआयव्ही संसर्गाचे विविध मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय, सुरक्षिततेच्या बाबी तसेच शासनाकडून उपलब्ध असलेल्या मोफत उपचार व आरोग्यसेवांची सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. बाधित व्यक्तींचे हक्क व कायदेशीर संरक्षण कार्यक्रमात एचआयव्ही आणि एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) कायद्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. एचआयव्ही बाधित व्यक्तींना मिळणारे कायदेशीर संरक्षण, त्यांचे हक्क आणि गोपनीयतेचा अधिकार याबाबतही कामगारांना माहिती देण्यात आली. बॅनर, पोस्टर तसेच टोल फ्री क्रमांक आणि क्यूआर कोडच्या माध्यमातून रिस्क असेसमेंट संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

## तामसवाडीत शिक्षक दिनाची ५४ वर्षांची अनोखी परंपरा कायम

### माजी सरपंच हिरामण पवार यांचा उपक्रम




जन सम्राट टाईम्स

**पारोळा| प्रतिनिधी:** शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची अनोखी परंपरा पारोळा तालुक्यातील तामसवाडी गावाने गेल्या ५४ वर्षांपासून अखंड जपली आहे. गावाचे माजी सरपंच हिरामण पवार यांनी सुरू केलेल्या या उपक्रमांतर्गत दरवर्षी शिक्षक दिनानिमित्त गावातील विविध शाळांमधील शिक्षकांचा सन्मान केला जातो. यंदाही ५ सप्टेंबर रोजी माध्यमिक विद्यालय, तामसवाडी येथे शिक्षक दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.


यावेळी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा परिषद कन्या शाळा, जिल्हा परिषद मुलांची शाळा तसेच वस्ती शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ‘शिक्षकांचा सन्मान करणे हे गावाचे कर्तव्य’ यावेळी मनोगत व्यक्त करताना हिरामण पवार म्हणाले, “शिक्षक वर्षभर ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून नवीन पिढी घडवतात. त्यामुळे गावाचा नागरिक म्हणून त्यांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे.” कार्यक्रमाच्या व्यासपीठावर मुख्याध्यापक ए. के. चव्हाण, उपमुख्याध्यापक डी. आर. पाटील, पर्यवेक्षक एम. वाय. लिंगायत, मुख्याध्यापिका डॉ. अश्विनी भदाणे, निलेश शिंदे आदी उपस्थित होते. विद्यार्थिनी अंजली जगदेव व समृद्धी राकेश पाटील यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. ५४ वर्षांची परंपरा कौतुकास्पद मुख्याध्यापक ए. के. चव्हाण यांनी ५४ वर्षांपासून ही परंपरा अखंड सुरू ठेवल्याबद्दल हिरामण पवार यांचे आभार मानले. तसेच गावाने शिक्षकांवर ठेवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, असे आश्वासन सर्व शिक्षकांच्या वतीने दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सी. डी. पाटील यांनी केले, तर आभार एस. एस. बोरसे यांनी मानले. विशेष : ५४ वर्षांपासून शिक्षकांचा सन्मान करण्याची ही परंपरा तामसवाडीच्या सामाजिक आणि शैक्षणिक संस्कृतीतील एक आदर्श उपक्रम ठरत आहे.

## दापोरे जि.प. शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

### विद्यार्थ्यांनी साकारल्याशिक्षकांच्या भूमिका; प्रत्यक्ष अध्यापनातून अनुभवले ‘शिक्षक होण्याचे’ कौशल्य

जन सम्राट टाईम्स

**दापोरे । प्रतिनिधी :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दापोरे येथे ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिन उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी चक्क मुख्याध्यापक व शिक्षकांची भूमिका साकारत इयत्ता पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव दिला. विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका अत्यंत जबाबदारीने पार पाडत वर्गात अध्यापन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. शिक्षकाच्या भूमिकेचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि अध्यापनाची आवड विकसित होण्यास मदत झाली. निपुण भारत अभियानातून नाविन्यपूर्ण उपक्रम निपुण भारत अभियानांतर्गत दापोरे जिल्हा परिषद शाळेत सातत्याने विविध नाविन्यपूर्ण व विद्यार्थी-केंद्रित शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका अनुभवण्याची संधी देण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षकाची



भूमिका साकारली नाही, तर अध्यापनामागील जबाबदारी आणि कौशल्याचीही जाणीव करून घेतली. या उपक्रमासाठी मुख्याध्यापक गोपीचंद भालेराव तसेच शिक्षक राहुल मोरे, समाधान पाटील, शैला महाजन, कविता सोनवणे, सुवर्णा साळुंखे, कांचन राणे आणि उज्वला बेलदार यांचे मार्गदर्शन लाभले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण काळे व उपाध्यक्ष समाधान तांदळे यांचेही उपक्रमाला बहुमोल मार्गदर्शन मिळाले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारत केलेल्या या अभिनव उपक्रमामुळे शाळेत दिवसभर उत्साहाचे वातावरण होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांनी कौतुक केले. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दापोरे येथे ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिन उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी चक्क मुख्याध्यापक व शिक्षकांची भूमिका साकारत इयत्ता पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव दिला. विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका अत्यंत जबाबदारीने पार पाडत वर्गात अध्यापन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. प्रत्यक्ष अनुभव घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि अध्यापनाची आवड विकसित होण्यास मदत झाली. निपुण भारत अभियानातून नाविन्यपूर्ण उपक्रम निपुण भारत अभियानांतर्गत दापोरे जिल्हा परिषद शाळेत सातत्याने विविध नाविन्यपूर्ण व विद्यार्थी-केंद्रित शैक्षणिक उपक्रम राबविले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# दहीहंडीचा कार्यक्रम राधा पाटीलच्या अंगाशी, नृत्यांगनेवर गुन्हा दाखल; काय घडलं?

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** डान्सर राधा पाटील मुंबईकर हिच्यावर पुण्याच्या बिबवेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राधा पाटील हिच्यासह दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करणारे मंडळाचे अध्यक्ष भुषण सोनवणे आणि आयोजक अमोल कांटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लावणीच्या नावाने अश्लील डान्स सादर होऊ नये म्हणून रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचं प्रमाणपत्र दहीहंडीच्या कार्यक्रमासाठी सादर करण्याची अट होती. तसं प्रमाणपत्र सादर न झाल्यास संबंधित मंडळाला कार्यक्रमाची परवानगी नव्हती. संबंधित अट मान्य न केल्याने आता पुण्यात दहीहंडी आयोजकांसह मंडळाचे अध्यक्ष आणि डान्सर राधा पाटील हिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिघांवर पुण्याच्या बिबवेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास बिबवेवाडी पोलीस करत आहेत.

राज्यभरात नुकताच गोकुळाष्टमी आणि गोपाळकालाचा उत्साह बघायला मिळाला. या सणाच्या निमित्ताने राज्यभरात वेगवेगळ्या ठिकाणी दहीहंडीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुंबई, ठाणे, पुणे या शहरांमध्ये दहीहंडीच्या कार्यक्रमांना चांगलीच रंगत आलेली बघायला मिळाली. या कार्यक्रमांमध्ये टीव्ही मालिका, सिनेमांमध्ये दिसणारे कलाकार मंडळी मंचावर बघायला मिळाले. अनेक अभिनेत्री, डान्सर या







कार्यक्रमांच्या मंचावरुन दहीहंडी फोडणारे गोविंदा आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसले. यामध्ये प्रसिद्ध रिल्सस्टारदेखील सहभागी होते. पण या कार्यक्रमांवरुन नेटीझन्सकडून टीकेची झोडदेखील उठताना दिसत आहेत. एकीकडे सण, उत्सव साजरी होत असताना लावणीच्या नावाने आक्षेपार्ह डान्स स्टेप्सवर अनेकांचा आक्षेप आहे. हे असे प्रकार याच उत्सवात झाले आहेत, असं नाही. तर याआधीदेखील सर्रासपणे अश्लील नृत्य झाल्याचे काही ठिकाणी बघायला मिळाले आहे. अशाप्रकारचे डान्स मोठ्या मंचावरुन होऊ नये, यासाठी काही अटी घालण्यात आल्या होत्या. कारण अशा डान्स स्टेप्सवरुन लहान मुलांवर काय संस्कार होतील? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तसेच समाज म्हणून आपली वाटचाल कोणत्या दिशेला यामुळे होते? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. यामुळे रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचं प्रमाणपत्राची अट ठेवण्यात आली होती. पण ही अट पाळली न गेल्यामुळे पुण्यात राधा पाटील हिच्यासह मंडळाचे अध्यक्ष आणि आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

एफआयआरमध्ये काय म्हटलं आहे?

"चालु वर्षी श्री कृष्ण जन्माष्टमी आणि दहिहंडी उत्सव सन 2026 चे अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीतील उत्सव साजरा करणारे मंडळे स्पिकर, मिरवणुक परवाना, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतर कार्यक्रमाच्या अनुषंगाने परवानगी मिळणेकामी अर्ज सादर केले होते. त्याप्रमाणे कात्रजला राहणारे एम्पायर ग्रुप ए. के. बॉइजचे अध्यक्ष भुषण सोनवणे यांनी 06/09/2026 रोजी दहिहंडी उत्सवाच्या निमित्ताने लावणी नृत्यांगणा/कलाकार राधा पाटील यांचे लावणी कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमास परवानगी मिळण्यासाठी त्यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात अर्ज सादर केला होता."डान्सर राधा पाटील मुंबईकर हिच्यावर पुण्याच्या बिबवेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राधा पाटील हिच्यासह दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करणारे मंडळाचे अध्यक्ष भुषण सोनवणे आणि आयोजक अमोल कांटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लावणीच्या नावाने अश्लील डान्स सादर होऊ नये म्हणून रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचं प्रमाणपत्र दहीहंडीच्या कार्यक्रमासाठी सादर करण्याची अट होती. तसं प्रमाणपत्र सादर न झाल्यास संबंधित मंडळाला कार्यक्रमाची परवानगी नव्हती.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## सायलेंसर चोरणारी उत्तर प्रदेशातील टोळी पारोळा पोलिसांच्या जाळ्यात



जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** ईको वाहनांच्या सायलेंसरमधील Catalytic Converter मध्ये असलेले प्लॅटिनम, पॅलेडियम आणि रोडियम हे मौल्यवान धातू चोरण्याच्या तयारीत असलेल्या उत्तर प्रदेशातील टोळीचा पारोळा पोलिसांनी पर्दाफाश केला. पोलिसांनी दोन संशयित आरोपींना अटक करून त्यांच्याकडून मारुती वॅगनार कार, ईको वाहनांचे सायलेंसर, मौल्यवान धातू तसेच चोरीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ६ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

गोपनीय माहितीवरून पोलिसांची नाकाबंदी

५ सप्टेंबर २०२६ रोजी पारोळा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना गोपनीय बातमीदारामार्फत काही संशयित इसम ईको वाहनांचे सायलेंसर चोरून त्यातील मौल्यवान धातू काढण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जळगाव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. त्यानंतर परिसरात नाकाबंदी करून संशयित वाहनांचा शोध सुरू करण्यात आला.

महामार्गावर संशयास्पद वॅगनार अडवली

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील म्हसवे गावाजवळ सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास संशयास्पदरीत्या फिरणारी मारुती वॅगनार कार (क्र. DL-3-CBU-3358) पोलिसांनी अडवली. कारमध्ये असलेल्या दोघांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे यासिफ यामीन चौधरी (वय २२, रा. गाझियाबाद, उत्तर प्रदेश) आणि आरीफ सलीम (वय २३, रा. अलीगढ, उत्तर प्रदेश) अशी सांगितली. वाहनाची झडती घेतली असता पोलिसांना सायलेंसर काढण्यासाठी वापरण्यात येणारे लोखंडी टॉमी, हातोडा, रिंच सेट, ईको वाहनांचे तीन सायलेंसर तसेच एका थैलीत दहा कॅरीबॅग आढळून आल्या. या कॅरीबॅगमध्ये सायलेंसरमधील प्लॅटिनम, पॅलेडियम व रोडियम धातूचा साठा आढळून आला. पारोळा तालुक्यातील रस्त्यांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी उभ्या असलेल्या ईको वाहनांचे सायलेंसर चोरी करून त्यातील मौल्यवान धातू काढण्याचे नियोजन असल्याची माहिती तपासात समोर आली. ६ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी केलेल्या कारवाईत खालील मुद्देमाल

दोघांना अटक; पुढील तपास सुरू

पोलीस कॉन्स्टेबल आकाश पाटील यांच्या फिर्यादीवरून पारोळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक पिंपळे करीत आहेत. ही धडक कारवाई पोलीस निरीक्षक दीपक पाटील, सपोनि अशोक पिंपळे, पोलीस उपनिरीक्षक विजय बोंबे व त्यांच्या पथकाने केली.

---

## एसटी आरक्षणासाठी धनगर समाज आक्रमक; धुळ्यात आक्रोश मोर्चातून सरकारला इशारा!

### राष्ट्रीय महामार्गाच्या कनेक्टिंग लिंकला हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी:** एसटी प्रवर्गातून धनगर समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी धुळ्यात सकल धनगर समाज आक्रमक झाला असून विविध मागण्यांसाठी भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला. शासनाने धनगर समाजाच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करावा, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली धनगर समाजाच्या विविध मागण्यांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलनाची भूमिका घेतली जात असून, त्याच पार्श्वभूमीवर धुळ्यातही समाजबांधव मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. शिवतीर्थ चौकातून मोर्चाला सुरुवात धुळ्यातील शिवतीर्थ चौकातून धनगर समाजाच्या आक्रोश मोर्चाला सुरुवात झाली. शिवतीर्थ चौकातून निघालेला मोर्चा सिव्हिल हॉस्पिटल मार्गे क्यूमाईन क्लब येथे पोहोचला.

यावेळी समाजबांधवांनी विविध मागण्यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधले. मोर्चाच्या माध्यमातून धनगर समाजाच्या प्रलंबित मागण्यांबाबत सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. मोर्चानंतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. एसटी आरक्षणाच्या मागणीवर ठाम भूमिका धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, ही प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाने ठोस आणि सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष करू नये. मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा धनगर समाजाच्या वतीने देण्यात आला. राष्ट्रीय महामार्ग आणि चर्चगेटच्या नामकरणाचीही मागणी धनगर समाजाच्या वतीने मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गाच्या कनेक्टिंग लिंकला हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली. तसेच मुंबईतील चर्चगेट स्थानकाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली. या मागण्यांमुळे धनगर समाजाच्या ऐतिहासिक आणि सामाजिक योगदानाला योग्य सन्मान मिळेल, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शासनाने धनगर समाजाच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर तातडीने निर्णय घ्यावा. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास यापुढे अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा मोर्चादरम्यान देण्यात आला.

---

## जामनेर तालुक्यात पोलिसांचे पहाटे धडक कॉम्बिंग ऑपरेशन; १८९ आरोपींची तपासणी

### जामनेर तालुक्यात पोलिसांचे पहाटे धडक कॉम्बिंग ऑपरेशन

जन सम्राट टाईम्स



**जामनेर । (प्रतिनिधी):** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध धंदे आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी जळगाव जिल्हा पोलीस दलाने जामनेर तालुक्यात पहाटेच्या सुमारास मोठी धडक कारवाई केली. ७ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे ३ वाजल्यापासून जामनेर, पहूर आणि फत्तेपूर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या मोहिमेदरम्यान एकूण १८९ रेकॉर्डवरील आरोपींची तपासणी करण्यात आली. दारूबंदी कायद्यान्वये १९ गुन्हे दाखल करून तब्बल ५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय एका हद्दपार नोटीसची बजावणी करण्यात आली असून ५ अजामीनपात्र वॉरंट (NBW) बजावण्यात आले. ५३ संशयित वाहने पोलिसांच्या रडारवर कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान ५२ मोटारसायकली आणि एका रिक्षेसह एकूण ५३ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली. या वाहनांची आरटीओ कार्यालयामार्फत पडताळणी सुरू असून, तपासणीत काही अनियमितता आढळल्यास संबंधित वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ५३ आरोपींची तपासणी दारूबंदी कायद्यान्वये ३ गुन्हे दाखल ₹१ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त २२ मोटारसायकलींची तपासणी १ NBW वॉरंट बजावले १७ अधिकारी, १५० अंमलदार आणि ४ आरसीपी पथकांची धडक नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसावा, यासाठी ही व्यापक कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक (चाळीसगाव) श्री. अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (पाचोरा विभाग) श्री. बापू रोहम यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत एकूण १७ पोलीस अधिकारी, १५० पोलीस अंमलदार आणि ४ आरसीपी पथकांनी सहभाग घेतला. आगामी काळातही धडक कारवाई सुरूच सण-उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच अवैध धंदे आणि गुन्हेगारी कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी अशा प्रतिबंधात्मक कारवाया यापुढेही सातत्याने राबविण्यात येतील, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. पहाटेच्या या धडक कॉम्बिंग ऑपरेशनमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये पोलिसांचा धाक निर्माण झाला असून, नागरिकांमध्येही सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यास मदत झाली आहे.

---

## पाडवी नूतन विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा विद्यार्थी शिक्षकांनी घेतली अध्यापनाची जबाबदारी

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या आर.आर. पाडवी नूतन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धुळे येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य दादासाहेब श्री. के.जी. गर्दे होते. यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक श्रीमती पी.व्ही. पाटील, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख श्रीमती के.एन. रवंदळे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाच्या सुरुवातीला व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमांचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री. के.जी. गर्दे यांचा सत्कार विद्यार्थी मुख्याध्यापक मच्छिंद्र मालचे यांनी केला. तसेच प्राचार्य श्री. गर्दे यांच्या हस्ते विद्यालयातील सर्व गुरुजनांचा पेन व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांनी प्राचार्य तसेच सर्व




प्राध्यापक व प्राध्यापिकांचा सत्कार केला.माध्यमिक विभागातील विद्यार्थी शिक्षकांचाही कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. के.जी. गर्दे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थी शिक्षकांनी सांगितले अध्यापनाचे अनुभव शिक्षक दिनानिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत अध्यापनाचा अनुभव घेतला. विद्यार्थी मुख्याध्यापक व विद्यार्थी शिक्षकांनी आपल्या मनोगतातून अध्यापन करताना आलेले अनुभव कथन केले. यावेळी शिक्षकांच्या मनोगतातून श्री. एन.एस. पाटील आणि प्रा. श्री. भूषण पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. प्राचार्यांकडून विद्यार्थी शिक्षकांचे कौतुक अध्यक्षीय भाषणात प्राचार्य श्री. के.जी. गर्दे यांनी सर्व शिक्षकवृंदाला शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थी शिक्षकांनी जबाबदारी स्वीकारून केलेल्या अध्यापनाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षक-विद्यार्थी नाते याबाबत त्यांनी अनमोल विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संदीप शेलार यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती सोनाली ठाकरे यांनी केले.

---

## स्वरांजलीतून लक्ष्मीकांतजींच्या स्मृतींना सुरेल अभिवादन

### नाट्यगीत आणि भक्तिगीतांनी रंगली अविस्मरणीय मैफल; स्व. सचिन कासार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

जन सम्राट टाईम्स




**धरणगाव। प्रतिनिधी:** संगीत हे माणसाच्या मनाला आणि भावनांना जोडणारे प्रभावी माध्यम असून, सुख-दुःखाच्या प्रसंगी संगीत अंतःकरणाला आधार देते. सुखी व आनंदी जीवनासाठी संगीताची साथ अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व साहित्यिक डॉ. मिलिंद बागुल यांनी केले. श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट व डेडीया सर शिष्य परिवारातर्फे आयोजित स्व. लक्ष्मीकांतजी डेडीया चतुर्थ संगीत महोत्सवात उद्घाटनपर मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध उद्योजक जीवनसिंह बयस होते, तर कांतीशेठ डेडीया प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर स्व. लक्ष्मीकांतजी डेडीया यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राहुल जैन यांनी प्रास्ताविक केले. सौ. आरती जैन यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष जीवनसिंह बयस यांचा डॉ. मिलिंद डहाळे यांनी, उद्घाटक डॉ. मिलिंद बागुल यांचा राहुल जैन यांनी, तर प्रमुख अतिथी कांतीशेठ डेडीया यांचा प्रा. बी. एन. चौधरी व प्रमोद जगताप यांनी सत्कार केला. गझलच्या सुरांनी रंगली मैफल महोत्सवातील सांगीतिक कार्यक्रमाने रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. मुंबईचे प्रसिद्ध गझल गायक सुरजप्रकाश सिंग यांनी 'फिर छिडी रात', 'रंजिश ही सही', 'यूँ ही बेसबब', 'हे तुझे या आसवांना' यांसह जगजीतसिंह यांच्या लोकप्रिय गझलांची सुरेल लडी सादर करून रसिकांची मने जिंकली. खान्देशचे सुपुत्र व पं. विवेक सोनार यांचे शिष्य असलेले प्रसिद्ध बासरीवादक योगेश पाटील व त्यांच्या शिष्यवृंदाने अप्रतिम बासरीवादन सादर केले. प्रशांत कुलकर्णी, परमानंद दीदी, गोपाल बडगुजर, निलेश राजपूत आणि घनश्याम माळी यांनीही बासरीच्या सुरांनी वातावरण सुरमयी केले. नाना पवार, प्रदीप झुंझाराराव, राजेश डहाळे आणि तनय डहाळे यांनी नाट्यगीत, भक्तिगीत, भावगीत तसेच कव्वाली सादर करून रसिकांची दाद मिळवली. गझल गायनाला पियुष डहाळे, तर बासरीवादनाला तुषार पुराणिक यांनी तबल्याची सुरेख साथ दिली. स्व. सचिन कासार यांना भावपूर्ण श्रद्धांजली स्वरांजली महोत्सवात नेहमी उत्स्फूर्त सहभाग घेणारे तसेच उत्तम गायक म्हणून परिचित असलेले स्व. सचिन कासार यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत सादर झालेल्या सुरेल कार्यक्रमामुळे वातावरण भावूक झाले. कार्यक्रमाच्या शेवटी तनय डहाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी तसेच डेडीया सर शिष्य परिवाराने परिश्रम घेतले.

---

## कुणबीच्या 58 लाख नोंदी ग्रामपंचायतीमध्येप्रसिद्धहोणार

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** अंतरवाली सराटी उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज 10 वा दिवस आहे. मात्र, त्यांच्या सगळ्या मागण्या पूर्ण न झाल्याने ते उपोषणावर ठाम आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारची बाजू मांडली. निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या 58 लाख नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार असून, 10 ते 17 सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करावीत; तसेच सर्व जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवून आरक्षणातील प्रत्येक प्रश्नाबाबत गांभीर्याने कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या. जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर, जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्याशी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेऊन झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. जिल्हानिहाय देण्यात आलेली जात पडताळणी प्रमाणपत्रांची संख्या, कुणबी नोंदी तसेच प्राप्त झालेल्या अर्जांचा सविस्तर आढावा विखे पाटील यांनी घेतला. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये सादर केली. त्यामध्ये प्रामुख्याने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सापडलेल्या नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत. त्याच पद्धतीने इतर जिल्ह्यांनीही अशाच प्रकारची कार्यवाही करावी.

# अंडरवर्ल्ड भागातून मला 92 टक्के मतदान : गडकरी

## सुशिक्षित भागांत ७० ते ७५ टक्के मते मिळाल्याचा दावा; ‘मतदानाचा अर्थ माझा त्यांच्या कामांना पाठिंबा असा नाही’ अशी गडकरींची स्पष्टोक्ती

जन सम्राट टाईम्स

**नागपूर। प्रतिनिधी:** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आपल्या बेधडक आणि रोखठोक वक्तव्यांसाठी ओळखले जातात. नागपुरातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपल्या निवडणुकीतील मतदानाचा संदर्भ देत केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. शहरातील सुशिक्षित भागांच्या तुलनेत क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरिया असलेल्या भागांत आपल्याला अधिक मतदान मिळाल्याचा दावा गडकरी यांनी केला. या भागांतून तब्बल ९२ टक्के मतदान, तर मोठ्या सुशिक्षित भागांतून ७० ते ७५ टक्के मते मिळाल्याचे त्यांनी सांगितले. जात, पंथ, धर्म आणि भाषा यांच्यापलीकडे जाऊन प्रत्येक व्यक्तीकडे पाहण्याची गरज असल्याचे मत गडकरी यांनी यावेळी व्यक्त केले. समाजातील विविध घटकांशी संबंध ठेवणे हे राजकारणात काम करताना स्वाभाविक असल्याचे सांगत त्यांनी आपल्या राजकीय प्रवासातील अनुभवही मांडले. गडकरी म्हणाले की, “मी या सगळ्यातून गेलो आहे. राजकारणात चांगलेही केले आणि वाईटही केले. सर्वांसोबत माझे संबंध आहेत.” निवडणुकीतील मतदानाचा संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, मोठ्या सुशिक्षित भागांतून आपल्याला ७० ते ७५ टक्के मते मिळाली; मात्र क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरिया असलेल्या भागांतून तब्बल ९२ टक्के मते मिळाली. ‘वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढू नये’ या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढू नये, असे गडकरी यांनी स्पष्ट केले. “अंडरवर्ल्ड माझ्या सोशल वर्कचे सपोर्टर असले, तरी याचा अर्थ माझे त्यांच्याशी खूप जास्त संबंध आहेत किंवा मी त्यांच्या कामाला समर्थन देतो, असा नाही,” असे त्यांनी स्पष्ट केले. आपण या भागांत रस्ते, सामाजिक उपक्रम आणि विकासाची विविध कामे केली. त्यामुळे तेथील नागरिकांनी विकासकामांच्या आधारे मतदान केले असावे, असा संदर्भही त्यांनी दिला. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याचा संबंध सामाजिक कामे आणि विकासाच्या राजकारणाशी जोडला जावा, असे त्यांनी सूचित केले. समाजासाठी काहीतरी देण्याची मानसिकता हवी लोकशाही आणि राजकारणातील विश्वासार्हतेवर भाष्य करताना गडकरी यांनी केवळ पैसा कमावणे पुरेसे नसून समाजासाठी काहीतरी करण्याची मानसिकता असणे आवश्यक असल्याचे सांगितले. समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन विकासाची कामे केल्यास त्याचा राजकीय फायदा मिळतो, असे त्यांनी नमूद केले. काही लोक मोठ्या प्रमाणात पैसा कमावतात; मात्र त्यातील अगदी छोटासा हिस्सा देखील समाजासाठी खर्च करण्याची त्यांची तयारी नसते. त्याउलट काही



व्यक्ती आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा सामाजिक कार्यासाठी देतात, असे उदाहरण देत त्यांनी सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित केले. गडकरींच्या ‘क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरियातून ९२ टक्के मतदान’ तसेच ‘अंडरवर्ल्ड माझ्या सोशल वर्कचे सपोर्टर’ या वक्तव्यांची सध्या नागपुरातील राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र, गडकरी यांनी स्वतःच या वक्तव्याचा अर्थ अंडरवर्ल्डच्या कारवायांना पाठिंबा असा घेऊ नये, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आपल्या बेधडक आणि रोखठोक वक्तव्यांसाठी ओळखले जातात. नागपुरातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपल्या निवडणुकीतील मतदानाचा संदर्भ देत केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. शहरातील सुशिक्षित भागांच्या तुलनेत क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरिया असलेल्या भागांत आपल्याला अधिक मतदान मिळाल्याचा दावा गडकरी यांनी केला. या भागांतून तब्बल ९२ टक्के मतदान, तर मोठ्या सुशिक्षित भागांतून ७० ते ७५ टक्के मते मिळाल्याचे त्यांनी सांगितले. जात, पंथ, धर्म आणि भाषा यांच्यापलीकडे जाऊन प्रत्येक व्यक्तीकडे पाहण्याची गरज असल्याचे मत गडकरी यांनी यावेळी व्यक्त केले. समाजातील विविध घटकांशी संबंध ठेवणे हे राजकारणात काम करताना स्वाभाविक असल्याचे सांगत त्यांनी आपल्या राजकीय प्रवासातील अनुभवही मांडले. गडकरी म्हणाले की, “मी या सगळ्यातून गेलो आहे. राजकारणात चांगलेही केले आणि वाईटही केले. सर्वांसोबत माझे संबंध आहेत.” निवडणुकीतील मतदानाचा संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, मोठ्या सुशिक्षित भागांतून आपल्याला ७० ते ७५ टक्के मते मिळाली; मात्र क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरिया असलेल्या भागांतून तब्बल ९२ टक्के मते मिळाली. ‘वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढू नये’ या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढू नये, असे गडकरी यांनी स्पष्ट केले. “अंडरवर्ल्ड माझ्या सोशल वर्कचे सपोर्टर असले, तरी याचा अर्थ माझे त्यांच्याशी खूप जास्त संबंध आहेत किंवा मी त्यांच्या कामाला समर्थन देतो, असा नाही,” असे त्यांनी स्पष्ट केले. आपण या भागांत रस्ते, सामाजिक उपक्रम आणि विकासाची विविध कामे केली. त्यामुळे तेथील नागरिकांनी विकासकामांच्या आधारे मतदान केले असावे, असा संदर्भही त्यांनी दिला. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याचा संबंध सामाजिक कामे आणि विकासाच्या राजकारणाशी जोडला जावा, असे त्यांनी सूचित केले. समाजासाठी काहीतरी देण्याची मानसिकता हवी लोकशाही आणि राजकारणातील विश्वासार्हतेवर भाष्य करताना गडकरी यांनी केवळ पैसा कमावणे पुरेसे नसून समाजासाठी काहीतरी करण्याची मानसिकता असणे आवश्यक असल्याचे सांगितले. समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन विकासाची कामे केल्यास त्याचा राजकीय फायदा मिळतो, असे त्यांनी नमूद केले. काही लोक मोठ्या प्रमाणात पैसा कमावतात; मात्र त्यातील अगदी छोटासा हिस्सा देखील समाजासाठी खर्च करण्याची त्यांची तयारी नसते.गडकरींच्या ‘क्रिमिनल, अंडरवर्ल्ड आणि रेड लाईट एरियातून ९२ टक्के मतदान’ तसेच ‘अंडरवर्ल्ड माझ्या सोशल वर्कचे सपोर्टर’ या वक्तव्यांची सध्या नागपुरातील राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र, गडकरी यांनी स्वतःच या वक्तव्याचा अर्थ अंडरवर्ल्डच्या कारवायांना पाठिंबा असा घेऊ नये, अशी स्पष्ट भूमिका मांडली आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## मरीमाता देवस्थान ट्रस्टचा सेवाभावी उपक्रम

### अन्नदानासह विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी :** जागृत मरीमाता देवस्थान शैक्षणिक सांस्कृतिक ट्रस्ट, बोदवड यांच्या वतीने मलकापूर रोडवरील जागृत मरीमाता देवस्थान येथे मरीमाता महापूजा व आरती, अन्नदान, होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप तसेच गौमातेला गौग्रास देण्याचा सेवाभावी उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. धार्मिक श्रद्धेसोबतच शैक्षणिक आणि सामाजिक बांधिलकी जपत ट्रस्टच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. विधिवत महापूजा आणि भाविकांसाठी अन्नदान सालाबादप्रमाणे जागृत मरीमाता देवस्थान येथे विधिवत महापूजा व आरती करण्यात आली. यावेळी भाविकांनी श्रद्धेने मरीमातेचे दर्शन घेतले.

महापूजेनंतर उपस्थित भाविक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांसाठी अन्नदानाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक कार्यक्रमासोबत समाजातील गरजू घटकांसाठी सेवाभावी उपक्रम राबविण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, या उद्देशाने होतकरू विद्यार्थ्यांना वह्या, पेन आणि आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळण्यासोबतच शिक्षणाची नवी प्रेरणाही मिळाली. समाजातील दानशूर व्यक्तींनी शिक्षणासाठी पुढे येण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. गौमातेला गौग्रास देत सेवाभावाचा संदेश धार्मिक परंपरेसोबतच प्राणीसेवेचा संदेश देण्यासाठी गौमातेला गौग्रास देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून धर्म, सेवा आणि सामाजिक दायित्व यांची सांगड घालण्याचा प्रयत्न ट्रस्टच्या वतीने करण्यात आला. “छोटीशी मदत विद्यार्थ्याच्या भविष्यासाठी मोठी प्रेरणा” या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील दानशूर व्यक्ती, भाविक आणि नागरिकांनी सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश देण्यात आला. उज्वल भविष्यासाठी मोठी प्रेरणा ठरू शकते,” या भावनेतून भविष्यातही विविध सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प ट्रस्टच्या वतीने व्यक्त करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती; सहकार्य करणाऱ्यांचे आभार कार्यक्रमास संस्थापक देविदास राखोंडे, किरण चौधरी, राजू जयस्वाल, अध्यक्ष निवृत्ती राखोंडे, उपाध्यक्ष संतोष तेली, सचिव स्वाती राखोंडे आणि कोषाध्यक्ष धनराज राखोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.या उपक्रमासाठी तेजस सरवणकर (मुंबई), यशोदास राखोंडे (मुंबई), उज्वला माळी, राहुल घाटे, धर्मेश राखोंडे तसेच समस्त गावकरी बांधवांचे मोलाचे सहकार्य लाभले.

---

## अल्पवयीनांच्या बेफाम बाईकस्वारीचा धोका; सणासुदीच्या गर्दीत अपघाताची भीती!

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** नशिराबाद शहरात गेल्या काही दिवसांपासून अल्पवयीन मुला-मुलींकडून दुचाकी वाहने चालवण्याचे प्रमाण चिंताजनकपणे वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः सणासुदीचे दिवस सुरू असल्याने आगामी काळात बाजारपेठा, मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत अल्पवयीनांच्या हातातील वेगवान वाहने नागरिकांसाठी तसेच त्यांच्या स्वतःच्या जीवितासाठी गंभीर धोका ठरू शकतात. पालकांची बेफिकिरी ठरू शकते जीवघेणी अल्पवयीन मुलांना वाहन चालवण्याची कायदेशीर पात्रता नसतानाही अनेक पालक त्यांच्याकडे दुचाकीची चावी सहजपणे सोपवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मुलांचा हट्ट, दैनंदिन कामांची घाई किंवा वाहन देण्याची सवय यामुळे पालकांकडून वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. वाहन चालविण्यासाठी आवश्यक वय आणि परवाना नसताना अल्पवयीन मुलांनी दुचाकी



चालवणे हे स्वतःसह इतरांच्या जीवितासाठीही धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पालकांनीही आपल्या मुलांच्या सुरक्षेबाबत अधिक जबाबदारीने वागण्याची गरज निर्माण झाली आहे. ट्रिपल सीटपासून स्टंटबाजीपर्यंत प्रकार शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा तसेच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात काही अल्पवयीन मुले वेगाने दुचाकी चालवताना दिसत असल्याचे नागरिक सांगतात. काही ठिकाणी ट्रिपल सीट प्रवास, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे किंवा कानात हेडफोन लावणे, तसेच धोकादायक पद्धतीने वाहन चालविण्याचे प्रकारही निदर्शनास येत आहेत. या प्रकारांमुळे एखाद्या क्षणी नियंत्रण सुटून गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः सणासुदीच्या काळात रस्त्यांवर वाढणारी गर्दी लक्षात घेता परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी पोलिसांनी मोहीम राबवावी नशिराबाद पोलीस प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन अल्पवयीनांकडून होणाऱ्या बेकायदेशीर वाहनचालना तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. अल्पवयीनांना वाहने देणाऱ्या पालकांनाही नियमांची जाणीव करून देण्याबरोबरच, कायद्यानुसार आवश्यक ती दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच शाळा-महाविद्यालय परिसर, बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष वाहतूक तपासणी करून बेफाम वाहनचालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. सणासुदीच्या काळात एखादी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता प्रशासनाने वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नशिराबाद शहरातील सुजाण नागरिकांकडून व्यक्त होत आहे.


---

## महावितरणचा शेतकऱ्यांसोबत विजेचा लपंडाव; रात्रीही वीज गायब!

### कृषीपंपांसाठी नियमित वीजपुरवठा मिळत नसल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**भवरखेडे । प्रतिनिधी:** भवरखेडे परिसरातील शेतकऱ्यांना कृषीपंपांसाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा नियमित मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. दिवसा वीजपुरवठा होत नाहीच, मात्र रात्रीच्या वेळीदेखील वीज उपलब्ध होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे महावितरणचा शेतकऱ्यांसोबत जणू विजेचा लपंडाव सुरू असल्याची संतप्त भावना शेतकरी बांधवांनी व्यक्त केली आहे. उभ्या पिकांना पाणी कसे द्यायचे? शेतातील उभ्या पिकांना वेळेवर पाणी देण्यासाठी कृषीपंपांचा वीजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा आहे. दिवसा वीज उपलब्ध नसल्याने अनेक शेतकरी रात्रीच्या वीजपुरवठ्यावर अवलंबून राहतात. मात्र रात्रीही वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. वीज कधी सुरू होईल, या प्रतीक्षेत शेतकरी रात्रभर जागे राहत असून वीज सुरू होताच मोटार सुरू करण्यासाठी



शेताकडे धाव घ्यावी लागते. मात्र अनेकदा प्रतीक्षा करूनही वीज उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांचा वेळ, श्रम आणि पैसा वाया जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उभ्या पिकांना वेळेवर पाणी न मिळाल्यास उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. मध्यरात्री महावितरण कार्यालयात धाव अनियमित वीजपुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या भवरखेडे येथील शेतकरी बांधवांनी अर्ध्या रात्री धरणगाव येथील महावितरण कार्यालयात धाव घेतली. यावेळी वीजपुरवठ्याच्या समस्येबाबत अधिकाऱ्यांकडे विचारणा करून आपली समस्या मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. वीजपुरवठा नेमका कधी सुरू होणार, दिवसा आणि रात्री वीज का उपलब्ध होत नाही, तसेच कृषीपंपांसाठी नियमित वीजपुरवठा कधी मिळणार, याबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा संताप आणखी वाढला. धरणगाव उड्डाणपुलावर रास्ता रोको महावितरण प्रशासनाच्या कारभाराविरोधात संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी दि. ६ रोजी मध्यरात्री धरणगाव उड्डाणपुलावर रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी शेतकऱ्यांनी नियमित वीजपुरवठ्याची मागणी करत प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कृषीपंपासाठी वीज मिळेल या आशेने रात्री उशिरापर्यंत जागे राहावे लागते.

---

## आरक्षण सोडतीच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना साधा चहाही नाही

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जळगाव तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जळगाव पंचायत समितीच्या सभागृहात पार पडला. सुमारे तासभर चाललेल्या या बैठकीत तालुक्यातून आलेले आजी-माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र, बैठकीस उपस्थित पदाधिकाऱ्यांना साधा चहादेखील देण्यात न आल्याने तहसीलदार मॅडम यांनी तीव्र नाराजी



व्यक्त केल्याची माहिती आहे. पंचायत समिती परिसरात चर्चेला उधाण या बैठकीला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक योगराज भाऊ सपकाळे, देऊळवाडा येथील सरपंच मुकेश भाऊ सोनवणे, प्रवीण भाऊ सपकाळे, आवाचे मनोज चौधरी, कानकवाड्याचे माजी सरपंच पुंडलिक सपकाळे, प्रा. पांडुरंग पाटील धानवड आदी मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते. बैठक संपल्यानंतर तहसीलदार मॅडम यांनी पंचायत समितीच्या एका विस्तार अधिकाऱ्याबाबत नाराजी व्यक्त केली. “एवढा वेळ बसूनही आम्हाला साधा चहा सुद्धा पाजण्यात आला नाही, हे बरोबर नाही,” अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात येते. या प्रकारानंतर पंचायत समिती परिसरात काही काळ कुजबुज व चर्चेला उधाण आले. बैठकीसाठी आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या चहापानाच्या व्यवस्थेवरून प्रशासनातील नियोजनाचा अभाव समोर आल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली.

---

## पारोळ्यात ‘आमदार दहीहंडी’ चा थरार; सात थरांच्या मनोऱ्याने मैदान दणाणले




जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** आमदार मा. ॲड. अमोलदादा पाटील यांच्या संकल्पनेतून पारोळा शहरातील एन.ई.एस. हायस्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेला भव्य ‘आमदार दहीहंडी सोहळा’ उत्साह, जल्लोष आणि थरारात संपन्न झाला. एरंडोल विधानसभा मतदारसंघात प्रथमच अशा भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मैदानावर मोठी गर्दी केली. मुंबई आणि पुणे यांसारख्या महानगरांमध्ये पाहायला मिळणाऱ्या भव्य दहीहंडी सोहळ्याचा थरार ग्रामीण भागातील नागरिकांनाही अनुभवता यावा, या उद्देशाने आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भव्य विद्युत रोषणाई, आकर्षक साउंड सिस्टीम आणि गोविंदा पथकांच्या थरारक सादरीकरणामुळे संपूर्ण मैदान जल्लोषाने दुमदुमून गेले. दहीहंडी सोहळ्यात विविध गोविंदा पथकांनी आपल्या कौशल्याचे दर्शन घडवत मानवी मनोरे उभारले. विशेष म्हणजे, तब्बल सात थरांचा मानवी मनोरा उभारत गोविंदा पथकांनी दहीहंडीला सलामी दिली. सात थरांचा हा थरार पाहण्यासाठी उपस्थित हजारो नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट करत गोविंदांचा उत्साह वाढविला. या अटीतटीच्या स्पर्धेत महात्मा फुले मित्र मंडळ, रावेर या संघाने दमदार कामगिरी करत सात थरांचा मनोरा उभारला आणि प्रथम क्रमांकाचा मान पटकावला. विजेत्या संघाला ₹१ लाख ५१ हजारांचे पारितोषिक देण्यात आले. श्रीकृष्ण बहुउद्देशीय संस्था, जळगाव यांनी द्वितीय क्रमांक पटकावत ₹३१ हजारांचे पारितोषिक, तर गोपालपुरा मित्र मंडळ, जळगाव यांनी तृतीय क्रमांक मिळवत ₹११ हजारांचे पारितोषिक पटकावले. सात थरांचा मानवी मनोरा उभारणाऱ्या सर्व गोविंदा पथकांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. पारोळा शहरासह एरंडोल, भडगाव तसेच संपूर्ण एरंडोल विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमधून नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित होते. गोविंदा पथकांचा थरार, प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि आकर्षक रोषणाई यामुळे कार्यक्रमाला भव्य स्वरूप प्राप्त झाले. एकंदरीत, आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या ‘आमदार दहीहंडी सोहळ्याने’ पारोळ्याच्या सांस्कृतिक आणि उत्सवी परंपरेत नवा अध्याय जोडला. सात थरांचा थरार आणि हजारो नागरिकांचा जल्लोष यामुळे हा सोहळा नागरिकांच्या स्मरणात राहणारा ठरला.

---

## दहीहंडी सुरु अन् वर्गखोलीत धामण सापाचा शिरकाव

### सर्पमित्राने २० मिनिटांत केला सुरक्षित रेस्क्यू, विद्यार्थी दुसऱ्या वर्गात असल्याने मोठा अनर्थ टळला!

जन सम्राट टाईम्स

**बोदवड । प्रतिनिधी:** नाडगाव येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या वर्गखोलीत धामण जातीचा साप शिरल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. विशेष म्हणजे, त्याचवेळी शाळेत बाल विद्यार्थ्यांसाठी दहीहंडीचा कार्यक्रम सुरू असल्याने सर्व विद्यार्थी दुसऱ्या वर्गखोलीत उपस्थित होते. त्यामुळे साप शिरलेल्या वर्गात एकही विद्यार्थी नसल्याने संभाव्य दुर्घटना टळली. झाडावरून पडला अन् थेट वर्गखोलीत शिरला शाळेच्या वर्गखोलीशेजारी असलेल्या धर्मशाळेसमोरील झाडावरून साप खाली पडला. यावेळी शाळेत पोषण आहार शिजविणाऱ्या वैशाली ताई पाटील



यांच्या निदर्शनास साप आला. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर शाळेतील शिक्षक महेंद्र पाटील, गोवर्धन सर तसेच शेजारील के. जी. पाटील हायस्कूलचे शिक्षक अंकित पाटील, कल्याण पाटील आणि कर्मचारी अनिल पौळ, सुरेश प्रजापती व नरेंद्रसिंग पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत साप वर्गखोलीत शिरला होता. त्यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये काही काळ धावपळ उडाली. दहीहंडीमुळे विद्यार्थी दुसऱ्या वर्गात दरम्यान, शाळेत बाल विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी दुसऱ्या वर्गखोलीत उपस्थित असल्याने साप शिरलेल्या खोलीत कोणताही विद्यार्थी नव्हता. विद्यार्थी नेमके दुसऱ्या वर्गात असल्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याचे दिसून आले. त्यामुळे शिक्षक, कर्मचारी आणि पालकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. सर्पमित्राला माहिती; २० मिनिटांत सुरक्षित रेस्क्यू घटनेची माहिती मिळताच शिक्षक महेंद्र पाटील व अंकित राजपूत यांनी सर्पमित्रांशी संपर्क साधला. दरम्यान, शिवसैनिक अमोल व्यवहारे यांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी शिरसाळा येथील सर्पमित्र समाधान गोसावी यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच समाधान गोसावी यांनी वेळ न दवडता नाडगावकडे रवाना होत अवघ्या २० मिनिटांत शाळेत पोहोचून सापाचा सुरक्षितपणे रेस्क्यू केला. धामण बिनविषारी; सापाला मारू नये रेस्क्यू करण्यात आलेला साप धामण जातीचा असून तो बिनविषारी असल्याची माहिती सर्पमित्र समाधान गोसावी यांनी दिली. सापांविषयी असलेल्या गैरसमज आणि अंधश्रद्धेमुळे नागरिकांमध्ये अनावश्यक भीती निर्माण होते. त्यामुळे साप आढळल्यास त्याला मारण्याऐवजी तात्काळ सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, सर्पदंशाची घटना घडल्यास अंधश्रद्धेच्या आहारी न जाता तात्काळ जवळच्या रुग्णालयात वैद्यकीय उपचार घ्यावेत, असेही त्यांनी सांगितले. शनिवारी सुट्टीच्या दिवशीही सर्पमित्राची सेवा सर्पमित्र समाधान गोसावी हे शिरसाळा येथील रहिवासी असून जळगाव एमआयडीसी येथे काम करतात. प्रत्येक शनिवारी सुट्टी घेऊन ते शिरसाळा येथील हनुमान मंदिरात सेवेकरी म्हणून उपस्थित राहत असतात. नाडगाव येथे साप आढळला त्यावेळी स्थानिक सर्पमित्र बाहेरगावी असल्याने अमोल व्यवहारे यांनी समाधान गोसावी यांना माहिती दिली. माहिती मिळताच त्यांनी तातडीने शिरसाळा ते नाडगाव प्रवास करून २० मिनिटांत घटनास्थळी पोहोचत सापाचा सुरक्षित रेस्क्यू केला.